सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ५/०२/२०२५

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्र.सीसीटी-०७२२/प्र.क्र.८७/भाग-१/ ई-८१४२८३/पोल-३, दि.४ फेब्रुवारी २०२५

**विषय :-** ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या सीसीटीव्ही प्रकल्पाचे प्रकल्प सल्लागार यांना मुदतवाढ देणेबाबत

******

**परिपत्रक :-**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्र.सीसीटी-०७२२/प्र.क्र.८७/भाग-१/ई-८१४२८३/पोल-३ , दि.४ फेब्रुवारी २०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०२०४१५४११६४१२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी .

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
पोलीस आयुक्त, ठाणे शहर
कार्यासन अधिकारी का.क्र.१७

प्रत:-
अपर पोलीस महासंचालक(नि.व.स) महाराष्ट्र राज्य मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक ( नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या सीसीटीव्ही प्रकल्पाचे प्रकल्प सल्लागार यांना मुदतवाढ देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्र. : सीसीटी ०७२२/प्र.क्र.८७/भाग-१/E-814283/पोल-३**
गृह विभाग, दुसरा मजला,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०४.०२.२०२५.

**वाचा :-**

१) शासन निर्णय क्र.गृह विभाग क्र.सीसीटी ०७२२/प्र.क्र.८७/पोल-३, दि.५.१.२०२४
२) अपर मुख्य सचिव (गृह) यांचे अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.५.७.२०२३, दि.९.१०.२०२३.
३) शासन पत्र गृह विभाग क्र.सीसीटी-०७२२/प्र.क्र.८७/पोल-३, दि.६.२.२०२४ व दि.१७.५.२०२४
४) अपर पोलीस महासंचालक (नि. व स.) यांचे पत्र क्र. पोमसं/१७/ठाणे शहर CCTV प्रकल्प/२८/२०२१, दि.१६.१.२०२५
५) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०२४/प्र.क्र.८०/अर्थ-३,दि.२५.७.२०२४.

**प्रस्तावना :-**

मुंबई दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर दि.२४.७.२०११ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार मुंबई शहर व राज्यात इतरत्र सीसीटीव्ही प्रकल्प राबविण्याबाबत निर्णय प्रक्रीया सुलभ करण्यासाठी दि.२७.७.२०११ च्या शासन निर्णयान्वये मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली "उच्चस्तरीय शक्तीप्रदत्त समिती" (High Power Committee) स्थापन करण्यात आली. सदर शासन निर्णयान्वये सुरक्षा विषयक उपाययोजना करण्याकरिता आवश्यक ते सर्व निर्णय घेण्यासाठी सदर समितीला प्राधिकृत करण्यात आले. तथापि, तत्कालीन मुख्य सचिव यांच्या सुचनेनुसार गृह विभाग शासन निर्णय दि.४.८.२०१७ अन्वये गृह विभागातील विविध प्रकल्पांच्या अंमलबजावणीत एकसुत्रता राहावी म्हणून विविध शहरात सीसीटीव्ही प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबतचा विषय अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या कार्यकक्षेत समाविष्ट करण्यात आला आहे.

२. महाराष्ट्र राज्यातील शहरांमध्ये नागरीकीकरणामुळे, औद्योगिकीकरणामुळे लोकसंख्येमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न, गुन्ह्यांमध्ये वाढ होत असलेली वाढ, यांचा विचार करुन "सुरक्षित शहर" ही संकल्पना राबविताना "सीसीटीव्ही यंत्रणा" बसविणे ही बाब महत्वाची ठरते. राज्यातील शहरांमध्ये सीसीटीव्ही प्रकल्प राबविण्यासाठी उपलब्ध साधनसामुग्री व निधी उपलब्धता विचारात घेऊन गृह विभागाने प्राधान्यक्रम धोरणाप्रमाणे ठाणे शहराचा समावेश केला आहे.

३. अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई यांनी दि.२९.१०.२०२१ च्या पत्रान्वये ठाणे शहरातील परिमंडळ १,२,४ व ५ या ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) शासनास सादर केला. या प्रकल्प प्रस्तावात १७४५ ठिकाणी एकूण ५४६८ सीसीटीव्ही कॅमेरे प्रस्तावित केले. सदर प्रस्ताव हा तांत्रिक मान्यतेसाठी माहिती

तंत्रज्ञान विभागाकडे पाठविण्यात आला. यावर माहिती तंत्रज्ञान विभागाने दि.२१.६.२०२३ रोजी दिलेल्या सहमतीनुसार अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक ५.७.२०२३ रोजीच्या बैठकीत "ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या सीसीटीव्ही प्रकल्प अहवाल (DPR) ला तत्वत: मंजूरी देऊन प्रकल्प अंमलबजावणी समिती (PIC) च्या दि.१.८.२०२३ रोजीच्या बैठकीत ठाणे शहर सीसीटीव्ही प्रकल्पासंदर्भात मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या.

अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक ९.१०.२०२३ रोजीच्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीमध्ये "ठाणे पोलीस आयुक्तालयाने केलेल्या सादरीकरणातील मुद्यांच्या अनुषंगाने ठाणे पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ १,२,३ (Integration) ४ व ५ मध्ये वाढीव एकूण ६०५१ सीसीटीव्ही कॅमेराच्या रु.४९२,८९,४१,१६७/-एवढ्या रक्कमेच्या प्रकल्प अहवालास उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीने अंतिम मान्यता दिली. त्यानुसार ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ १,२,३ (Integration), ४ व ५ या विभागात सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याबाबतचा प्रस्तावास प्रशासकीय मान्यता दि.५.१.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आली. प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त प्रमाणे होणारा खर्च हा "मागणी क्र.बी-१०, ४०५५ - पोलीस यावरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, (००) (०९) सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे (४०५५ ०२२३) या अंतर्गत ५२ यंत्रसामुग्री साधनसामुग्री " या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या वर्षाच्या उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा असे उक्त नमूद दि.५.१.२०२४ रोजीच्या शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

४. ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या सीसीटीव्ही यंत्रणा उभारणीचा प्रकल्प प्रभावीपणे राबविणेकरिता प्रकल्प सल्लागाराची RFP तयार करण्यापासून ते GO LIVE होईपर्यंत आवश्यकता असल्याने त्यांच्या शुल्काची तरतूद सविस्तर प्रकल्प अहवाल DPR प्रकल्प खर्चामध्ये Project Cost करण्यात आलेली आहे असे अपर पोलीस महासंचालक (नि. व स.) यांनी त्यांच्या दि.२१.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार गृह विभाग, शासन पत्र दि.६.२.२०२४ व दि.१७.५.२०२४ अन्वये पीडब्ल्युसी कंपनीला Work Order देण्यात आली आहे.

५. अपर पोलीस महासंचालक (नि. व स.) यांच्या दि.१६.१.२०२५ रोजीच्या पत्रास अनुसरुन ठाणे शहर सीसीटीव्ही प्रकल्पाच्या Project Implementation Phase & Go-Live Phase या कार्यकालासाठी दि.३०.९.२०२४ रोजी झालेल्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.पीडब्ल्युसी यांना दि.१६.१०.२०२४ ते दि.१५.१.२०२६ या कालावधीकरिता ५ सल्लागारांच्या नियुक्तीबाबत पत्रासोबत सादर केलेल्या **परिशिष्ट-अ** आणि **परिशिष्ट-ब** नुसार (१ मुख्य सल्लागार, १ वरिष्ठ सल्लागार, १ सल्लागार आणि २ सहयोगी सल्लागार) एकूण ५ सल्लागार हे Project Implementation Phase & Post Go-Live Phase चे कामकाज करतील असे स्पष्ट करण्यात आले असल्याने प्रकल्पाचे कामकाज सुरळीत व यशस्वीरित्या पूर्ण करणे, प्रकल्पाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे व प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरचे कामकाज व्यवस्थितरित्या पार पाडण्यासाठी मुदतवाढ देण्याची बाब विचाराधिन होती. त्याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :**

"ठाणे शहर सीसीटीव्ही प्रकल्पाच्या Project Implementation Phase & Go-Live Phase या कार्यकालासाठी दि.३०.९.२०२४ रोजी झालेल्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.पीडब्ल्युसी यांना ५ सल्लागारांच्या नियुक्तीबाबत पत्रासोबत सादर केलेल्या **परिशिष्ट-अ** आणि **परिशिष्ट-ब** नुसार (१ मुख्य सल्लागार, १ वरिष्ठ सल्लागार, १ सल्लागार आणि २ सहयोगी सल्लागार) एकूण ५ सल्लागार हे Project Implementation Phase & Post Go-Live Phase चे कामकाज करतील असे स्पष्ट करण्यात आले असल्याने प्रकल्पाचे कामकाज सुरळीत व यशस्वीरित्या पूर्ण करणे, प्रकल्पाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे व प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरचे कामकाज व्यवस्थितरित्या पार पाडण्यासाठी दि.१६.१०.२०२४ ते दि.१५.१.२०२६ या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यात येत आहे.

उपरोक्त प्रस्तावित खर्च हा "मागणी क्र.बी-१०, ४०५५ - पोलीस यावरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, (००) (०९) सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे (४०५५ ०२२३) या अंतर्गत ५२-यंत्रसामुग्री साधनसामुग्री" या लेखाशीर्षाखाली करण्यात यावा,व तो त्या-त्या वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ १,२,३ (Integration), ४ व ५ या विभागात सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याबाबतचा प्रस्तावास प्रशासकीय मान्यता दि.५.१.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आली असून सदर प्रकल्पांचा निधी कोषागारातून आहरित करण्यासाठी पोलीस आयुक्त,ठाणे यांना "नियंत्रक अधिकारी" म्हणून तसेच त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकाऱ्याला "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय, वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८,भाग-पहिला, उपविभाग-दोन, महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम,१९६५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार व अ.क्र.२७अ, नियम क्र.७६ अन्वये प्रशासकीय विभागाला असलेल्या अधिकारानुसार तसेच संदर्भ क्र.५ नुसार वित्त विभागाचे शासन परिपत्रक दि.२५.७.२०२४ अन्वये दिलेल्या सुचनांस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०२०४१५४११६४१२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148cc aa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6 CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2025.02.04 15:43:29 +05'30'

**( रा. ता. भालवणे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस आयुक्त, ठाणे.

३. मे. पीडब्ल्युसी प्रा.लि., २५२, वीर सावरकर मार्ग, शिवाजी पार्क, दादर, मुंबई-४०० ०२८.

**प्रत,**

१. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र शासन, मुंबई.
२. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
६. कार्यासन अधिकारी (व्यय-७ / विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. कार्यासन अधिकारी (अर्थसं-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवड नस्ती / पोल-३.